॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.8 ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने नंदूरबार येथे होणाऱ्या आदिवासी अकादमीसाठी प्रतिवर्षी पाच कोटी रुपये याप्रमाणे 25 कोटी रुपयांचा निधी, विद्यापीठात 200 क्षमतांच्या मुला-मुलींच्या वसतिगृहाला मंजूरी तसेच आर.ए.एन. अंतर्गत नर्सिंग कोर्स सुरु करण्यास मान्यता, आणि विद्यापीठातील बहिणाबाई अध्ययन व संशोधन केंद्रासाठी आवश्यक तो निधी आणि पदांना मान्यता देण्याची घोषणा मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी विद्यापीठ नामविस्तार सोहळयात आज केली. याशिवाय विद्यापीठासाठी गिरणा नदीवरुन पुराचे पाणी आरक्षित करुन विद्यापीठाच्या पाणी पुरवठा योजनेपर्यंत पाण्याची उपलब्धता करुन देण्यासाठी बंधारा देण्याचीही घोषणा मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा नामविस्तार सोहळा सोमवार, दि.8 ऑक्टोबर रोजी विद्यापीठाच्या पदवीप्रदान सभागृहात मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत अत्यंत उत्साहात पार पडला. यावेळी जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील, जलसंपदा व वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीष महाजन, नंदूरबार जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल, सहकार राज्यमंत्री गुलाबराव पाटील, कुलगुरु प्रा. पी. पी. पाटील, प्र-कुलगुरु प्रा. पी. पी. माहुलीकर, महापौर सीमा भोळे, जिल्हा परिषद अध्यक्षा उज्ज्वला पाटील यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी भूमिका कथनात विद्यापीठासाठी काही मागण्या राज्य सरकारकडून मान्य केल्या जाव्यात अशी अपेक्षा व्यक्त केली होती. तो धागा पकडून मुख्यमंत्र्यांनी वरील घोषणा यावेळी केल्या. याशिवाय विद्यापीठ वीज बील मुक्त करण्यासाठी विद्यापीठ परिसरातील सर्व इमारतींवर सोलर रुफ टॉपसाठी आवश्यक तो निधी अपारंपारिक ऊर्जा विभागाकडून दिला जाईल त्यासाठी विद्यापीठाने ऊर्जा विभागाकडे प्रस्ताव द्यावा असे सांगून मुख्यमंत्र्यांनी उर्वरित सर्व मागण्यांसाठी राज्य सरकार विद्यापीठाच्या पाठीशी पूर्ण ताकदीने उभे राहिल अशी ग्वाही यावेळी दिली.

आपल्या भाषणाची सुरुवात मुख्यमंत्र्यांनी अहिराणी भाषेत केली त्यावेळी उपस्थितांनी टाळयांचा कडकडाट केला. अहिराणी भाषेची गोडी अत्यंत वेगळी आहे. माणूस किती शिकला यापेक्षा त्याला ज्ञान काय प्राप्त झाले हे महत्वाचे आहे असे सांगून त्यांनी बहिणाबाईंच्या कवितांमध्ये निसर्ग, शेती, पशु-पक्षी, पारस्पारिक संबंध, उपदेश आणि सहज सुंदर विनोदाची खोली अत्यंत ठळकपणे प्रकट होते. बहिणाबाईंनी आपल्या काव्याद्वारे खानदेशाच्या समृध्द संस्कृतीला अत्युच्च शिखरावर नेले. जीवनाचे तत्वज्ञान इतक्या सोप्या शब्दात जगात अन्य कोणीही मांडले नाही. त्यांच्या कवितांमध्ये वैज्ञानिकता जशी होती तसे शब्दामागील ध्वनी उच्चार शास्त्र देखील होते. असे सांगताना मुख्यमंत्र्यांनी बहिणाबाईंच्या काही कवितांच्या ओळी म्हणून दाखवल्या. विद्यापीठाच्या परंपरेविषयी बोलताना त्यांनी भारतातील तक्षशिला आणि नालंदासारख्या विद्यापीठांनी जगाला समृध्दतेचा इतिहास शिकविला. मात्र परकीयांनी केलेल्या आक्रमणाने तो खजीना नष्ट झाला. परंतू ज्ञानाची ही परंपरा कायम राहिली. विद्यापीठे ही ज्ञानाची भांडारे असायला हवीत. जगात सर्वाधिक तरुणाई असलेला भारत हा देश आहे. ही तरुणाई देशाचे भाग्य बदलू शकते. तंत्रज्ञानाचा वापर करुन भारतातील तरुणांनी मोठे परिवर्तन घडविले आहे. संचारक्रांतीचे प्रणेते भारतातीलच तरुणाई आहे असेही श्री.फडणवीस म्हणाले. तरुणांनी ज्ञान-विज्ञान आणि साहित्य या आधारे प्राप्त केलेल्या ज्ञानावर आधारित समाज निर्मिती करण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन त्यांनी यावेळी केले. तरुणांनी वंचित घटकांसाठी काम करावे. विद्यापीठात समाजपयोगी संशोधन व्हावे आणि विचार-आचाराद्वारे परिवर्तन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त

करताना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने राज्यात स्वतंत्र ओळख निर्माण केल्याबद्दल कौतुक केले. तसेच परीक्षांचे निकाल ३० ते ४५ दिवसात लावण्याची परंपरा कायम ठेवली याबद्दल अभिनंदन केले. मुख्यमंत्र्यांनी यावेळी बहिणाबाई चौधरी यांच्या विचारांची उंची या विद्यापीठाने गाठावी अशीही अपेक्षा व्यक्त केली.

रोहयो व पर्यटन मंत्री श्री.जयकुमार रावल यांनी या विद्यापीठाने आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे असे सांगून नंदुरबार येथे उभारल्या जाणाऱ्या आदिवासी अकादमीसाठी जिल्हा नियोजन व विकास मंडळाकडून अडीच कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. अजुन वाढीव निधी दिला जाईल तसेच विद्यापीठाच्या उपकेंद्रासाठी देखील पाठपुरावा केला जाईल अशी ग्वाही दिली. विद्यापीठाने पर्यटनाचे अभ्यासक्रम सुरु करावे तसेच अहिराणी व आदिवासी साहित्य जोपासावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

प्रारंभी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी भूमिकाकथन करताना नामविस्ताराबद्दल राज्य शासनाचे आभार मानले. तसेच विद्यापीठाच्या प्रगतीचा आढावा सादर करुन राज्य सरकारकडे काही मागण्या केल्या. यावेळी बहिणाबाई चौधरी यांच्या नातसून पद्माबाई चौधरी यांचा मुख्यमंत्र्याच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उत्तमविद्याच्या नामविस्तार सोहळा विशेषांकाचे प्रकाशन देखील यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सुरुवातीला संगीत विभागाने विद्यापीठ गीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशुतोष पाटील, डॉ. राजश्री नेमाडे, प्रा. आर.बी. संदानशीव यांनी केले. कुलसचिव भ.भा. पाटील यांनी आभार मानले.

यावेळी मंचावर खा. रक्षा खडसे, खा. ए.टी. नाना पाटील, आ. एकनाथराव खडसे, आ. सतीश पाटील, आ. हरीभाऊ जावळे, आ. चंद्रकांत सोनवणे, आ. स्मिता वाघ, आ. चंदु पटेल, आ. संजय सावकारे, आ. सुरेश भोळे, आ. किशोर पाटील, आ. उन्मेष पाटील, उपमहापौर अश्विन सोनवणे, माजी आमदार गुलाबराव देवकर, गुरुमुख जगवाणी, रविंद्रभैय्या पाटील, जैन उद्योग समुहाचे अशोक जैन, प्रधानसचिव प्रवीणसिंह परदेशी, महसुल आयुक्त राजाराम माने, जिल्हाधिकारी किशोर राजे निंबाळकर, पोलिस अधिक्षक दत्तात्रय शिंदे यांच्यासह व्यवस्थापन परिषदेचे सदस्य दिलीप रामू पाटील, डॉ. केशव तुपे, डी.पी. नाथे, दीपक पाटील, विवेक लोहार, प्रा. नितीन बारी, प्रा. प्रिती अग्रवाल, प्राचार्य एल.पी. देशमुख, प्राचार्य डी.एस.सुर्यवंशी, प्रा. मोहन पावरा, प्रा. एस.टी. इंगळे, डॉ. सुभाष चौधरी, डॉ. जे.बी. नाईक, प्रा. ए.बी. चौधरी हे उपस्थित होते.

---

जा.क्र. : कबचौउमवि/१६/हस्तदेय /२०१८ दिनांक : ८ ऑक्टोबर, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी